
दै. "अॅग्रोवन" दि. २८/३/२०२२.

# राज्यातून अडीच हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट

## कृषी पणन मंडळाची माहिती

**अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा**



पुणे : देशातून दरवर्षी साधारणतः ५० हजार टन आंब्याची निर्यात होते. कोरोनानंतर यंदा आंब्याची निर्यात वाढविण्यासाठी राज्य कृषी पणन मंडळ सज्ज झाले आहे. यंदाच्या हंगामात अडीच हजार टन आंब्यावर प्रक्रिया करून निर्यात करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

राज्यातील हापूस, केसर, कर्नाटकातील बैंगनपल्ली आणि उत्तर प्रदेशातील दशहरी, चौसा आदी प्रजातींच्या आंब्यांवर महाराष्ट्रात प्रक्रिया करून त्याची निर्यात केली जाते. निर्यातपूर्व प्रक्रियेसाठी कृषी हवामान विभागांमध्ये निर्यात सुविधा केंद्रे उभारण्यात आलेली आहेत. या केंद्रांद्वारे विविध देशांच्या मागणीनुसार विविध प्रक्रिया करून आंबा निर्यात केला जातो. तर विविध आंब्यांना त्यांच्या भौगोलिक परिस्थिती आणि हवामानानुसार वैशिष्ट्यपूर्ण चवी आहेत. या चवींना जागतिक बाजारपेठ मिळावी आणि त्याचे आंतरराष्ट्रीय पातळीवर बाजारपेठ मिळावी यासाठी पणन मंडळ आणि कृषी विभागाच्या सहकार्याने भौगोलिक मानांकन प्राप्त आंब्याच्या निर्यातीसाठी सध्या सांघिक प्रयत्न सुरू असल्याचे पवार यांनी सांगितले.

गेल्या तीन-चार वर्षांपासून देशातून रशियात आंबा निर्यात केली जात आहे. यंदा रशिया-युक्रेनमधील युद्धामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्बंध आल्याने या निर्यातीबाबत साशंकता निर्माण झाली आहे. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अस्थिरता युरोप व अमेरिकेतील आंबा निर्यातीवर विपरीत परिणाम करेल की काय, या परिस्थितीकडे निर्यातदार लक्ष ठेऊन आहेत. परंतु, बहुतांश निर्यात नजीकचे देशांसह मध्यपूर्व आशियायी देशात होत असल्याने निर्यातीवर फारसा फरक पडणार नाही, असेही पवार यांनी सांगितले.

### निर्यातीसाठीच्या प्रक्रिया...

- आयातदार देशांच्या मागणीनुसार आंब्यावर विविध प्रक्रिया कराव्या लागतात
- व्हेपर हीट ट्रिटमेंट, हॉट वॉटर ट्रिटमेंट आणि विकिरण आदी प्रक्रियेचा यात समावेश आहे.
- या माध्यमातून आंब्यामधील फळमाशी व कोय किडीचे निर्मूलन केले जाते.
- प्रक्रिया झालेला आंबा जास्त काळ टिकतो आणि निर्यातीसाठी उत्तम स्थिती राहते.

### या देशात होतो निर्यात

अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अर्जेंटिना, इंग्लंड, जपान, न्यूझीलंड, दक्षिण कोरिया, मॉरिशस, इराण, मध्यपूर्व आशियायी देश आणि युरोपमधील देश

### देश : निर्यातीचे उद्दिष्ट (टनांमध्ये)

- जपान ........................ ५०
- दक्षिण कोरिया .............. ५०
- युरोपियन .................... ११००
- अमेरिका .................... १०००
- ऑस्ट्रेलिया ................ २००
- इतर देश .................... २००

दै. "ॲग्रोवन" दि. २२/३/२०२२.

# आंबा निर्यात वाढविण्यासाठी पणन महामंडळ सज्ज

## यंदा अडीच हजार टन निर्यातीचे उद्दिष्ट ; सुविधा कार्यान्वित



आंबा निर्यातीसाठी कृषी पणन मंडळाने विविध सुविधा कार्यान्वित केल्या आहेत.

प्रवीण डोके

**पुणे, ता. २१ : देशातून दरवर्षी साधारणतः ५० हजार टन आंब्याची निर्यात होते. त्यापैकी राज्यातून सुमारे ३५ ते ४० हजार टनांची निर्यात होते. कोरोनानंतर यंदा आंब्याची निर्यात वाढविण्यासाठी राज्य कृषी पणन मंडळ सज्ज झाले आहे. यंदाच्या हंगामात अडीच हजार टन आंब्यावर प्रक्रिया करून निर्यात करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.**

राज्यातील हापूस, केसर, कर्नाटकातील बैंगनपल्ली आणि उत्तर प्रदेशातील दशहरी, चौसा आदी प्रजातींच्या आंब्यांवर महाराष्ट्रात प्रक्रिया करून त्याची निर्यात केली जाते. पणन मंडळ आणि कृषी विभागाच्या सहकार्याने भौगोलिक मानांकन प्राप्त आंब्याच्या निर्यातीसाठी सध्या सांघिक प्रयत्न सुरू आहेत. मंडळाची निर्यात सुविधा केंद्र गतिमानतेने कार्यान्वित करण्यात आले. या सुविधांचा वापर करून विविध देशांत आंबा निर्यात केली जात असल्याची माहिती कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

### विविध प्रक्रियांचा समावेश

- आयातदार देशांच्या मागणीनुसार आंब्यावर विविध प्रक्रिया कराव्या लागतात
- व्हेपर हीट ट्रिटमेंट, हॉट वॉटर ट्रिटमेंट आणि विकिरण आदी प्रक्रियेचा यात समोवश आहे.
- या माध्यमातून आंब्यामधील फळमाशी व कोय किडीचे निर्मूलन केले जाते.
- प्रक्रिया झालेला आंबा जास्त काळ टिकतो आणि निर्यातीसाठी उत्तम स्थित राहतो.

**"गेल्या तीन-चार वर्षांपासून देशातून रशियात आंबा निर्यात केली जात आहे. यंदा रशिया-युक्रेनमधील युद्धामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्बंध आल्याने या निर्यातीबाबत साशंकता निर्माण झाली आहे. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अस्थिरता युरोप व अमेरिकेतील आंबा निर्यातीवर विपरीत परिणाम करेल की काय, या परिस्थितीकडे निर्यातदार लक्ष ठेवून आहेत. परंतु, बहुतांश निर्यात नजीकच्या देशांसह मध्यपूर्व आशियायी देशांत होत असल्याने निर्यातीवर फारसा फरक पडणार नाही.**

**- सुनील पवार,** कार्यकारी संचालक, राज्य कृषी पणन मंडळ.

### या देशांत होते निर्यात

अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अर्जेंटिना, इंग्लंड, जपान, न्यूझीलंड, दक्षिण कोरिया, मॉरिशस, इराण, मध्यपूर्व आशियायी देश आणि युरोपमधील देश

**निर्यातीचे उदिष्ट (टनांमध्ये)**

| | | | |
|---|---|---|---|
| ५० | जपान | अमेरिका | १००० |
| ५० | दक्षिण कोरिया | ऑस्ट्रेलिया | २०० |
| ११०० | युरोपियन | इतर देश | २०० |

दै. "अॅग्रोवन" दि. २०/३/२०२२.

# बाजार समित्यांच्या निवडणुका एप्रिलनंतर : सहकारमंत्री पाटील



कऱ्हाड : ''गावोगावच्या विकास सेवा सोसायट्यांच्या निवडणुका एप्रिल महिन्याच्या शेवटापर्यंत पार पडतील. त्यानंतर राज्यातील बाजार समित्यांच्या निवडणुका घेण्याची कार्यवाही केली जाईल. त्यादृष्टीने सहकार विभागाची कार्यवाही सुरू आहे,'' अशी माहिती सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांनी शनिवारी (ता.१९) दिली.

पाटील म्हणाले, ''जिल्हा बँकांच्या निवडणुका झाल्यानंतर गावोगावच्या सहकारी सेवा सोसायट्यांच्या निवडणुका या चुरशीने होत आहेत. त्यामुळे सोसायट्यांच्या निवडणुका झाल्यानंतर बाजार समितींच्या निवडणुका घ्याव्यात, असा सूर होता. विकास सेवा सोसायट्यांच्या निवडणुकांनंतर बाजार समित्यांच्या निवडणुका घेणार आहेत.''

विरोधी पक्षनेते दरेकर यांच्यावरील कारवाईबाबत पाटील म्हणाले, ''विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांच्याबद्दल 'आप'च्या शिंदे यांनी सहकार व गृह विभागाकडे तक्रार केली. दरेकर हे विधान परिषदेला उभे राहताना व्यवसाय म्हणून स्वतःची नोंद केली होती. मजूर म्हणून नोंद केलेली नव्हती. हा गुन्हा आहे, असे लक्षात आल्यावर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.''

पाटील म्हणाले, ''उसाच्या गाळपाचे नियोजन करण्याचे काम साखर आयुक्तांकडून सुरू आहे. कारखान्यांनी कार्यक्षेत्रातील ऊस संपल्याशिवाय गाळप बंद करू नये, असे कळवले आहे. गेल्या पाच वर्षांत फडणवीस सरकार सत्तेत असताना कोणत्याही ग्राहकाला वीजबिलाची मागणी केली नाही. लोकांत नाराजी आहे. शेती पंपाच्या वीजबिल अनुदान फरकाच्या रकमेबाबत अर्थ आणि ऊर्जा विभाग निर्णय घेईल.''

## '५० हजार रुपये यंदाच देणार'

''महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यावर महात्मा जोतीबा फुले कर्जमाफीची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. त्यानंतर ज्या शेतकऱ्यांनी नियमित कर्ज भरले आहे, त्यांना ५० हजार रुपये देण्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घोषणा केली. यंदाच्या अर्थसंकल्पात त्याची तरतूद केली आहे. या आर्थिक वर्षात ते अनुदान आम्ही देणार आहोत'', असे पाटील यांनी स्पष्ट केले.

## आता २०२४ ची डेडलाइन

पाटील म्हणाले, ''निव्वळ सत्तेच्या मागे लागल्यामुळे काही आरोप होताना दिसत आहेत. विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी '२०२४ पर्यंत आम्ही थांबत आहोत', असे सांगितले आहे. २०२४ च्या निवडणुकीला आम्ही दमदारपणे सामोरे जाऊ.''

दै: "महाराष्ट्र टाईम्स" दि. २०/३/२०२२.

# अडीच हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट

## प्रक्रिया करण्यासाठी पणन मंडळ सज्ज

म. टा. प्रतिनिधी, पुणे

दर वर्षी अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान आणि दक्षिण कोरियासह युरोपीयन देशांना निर्यात करण्यात येणाऱ्या अडीच हजार टन आंब्यावर प्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट पणन मंडळाने निर्धारित केले आहे. त्यासाठी पणन मंडळाच्या निर्यात कृषी सुविधा केंद्रांवरील सर्व तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

आंबा निर्यातीसाठी राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने दर वर्षी प्रयत्न करण्यात येतात. या प्रयत्नांना गेल्या दोन वर्षांत करोनाच्या संसर्गामुळे ब्रेक लागला होता. करोनाचा संसर्ग कमी झाल्याने आंबा निर्यातीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे राज्य कृषी पणन मंडळाने कंबर कसली आहे. 'दर वर्षी आंब्याची सुमारे ५० हजार टनांची निर्यात होते. त्यापैकी ३५ ते ४० हजार टनाचा वाटा एकट्या राज्याचा आहे. राज्यातून हापूस, केशर, कर्नाटकातील बैंगनपल्ली आणि उत्तर प्रदेशातील दशहरी, चौसा आदी आंब्याची निर्यात केली जाते. राज्यातून समुद्रामार्गे; तसेच हवाई सेवेमार्गे निर्यातीसाठीच्या सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. त्याशिवाय निर्यातक्षम उत्पादन, आंबा निर्यातीसाठी, निर्यातीपूर्वी आवश्यक प्रक्रिया उपलब्ध असल्याने आंबा निर्यातीसाठी राज्याकडे पाहिले जाते. आंब्याचा हंगाम लवकरच सुरू होणार असल्याने निर्यातीच्या दृष्टीने पणन मंडळाने तयारी सुरू केली आहे. भौगोलिक मानांकन प्राप्त (जीआय) आंब्याच्या निर्यातीसाठी; तसेच विक्रीसाठी पणन मंडळाने 'अपेडा'च्या मदतीने प्रयत्न सुरू केले आहेत,' अशी माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

### नऊ निर्यात सुविधा केंद्रे



आंब्याच्या निर्यातीसाठी राज्यात कृषी पणन मंडळाची नऊ सुविधा केंद्रे आहेत. त्यात पुणे जिल्ह्यातील बारामती, नाचणे (रत्नागिरी), जामसंडे (सिंधुदूर्ग), जालना, लातूर, बीड आणि वाशी येथील केंद्रांचा समावेश आहे. आंब्यावर 'व्हेपर हीट ट्रीटमेंट', 'हॉट वॉटर ट्रीटमेंट', विकिरण आदी प्रक्रिया करण्यात येतात. त्या सुविधा राज्यात उपलब्ध आहेत. आयातदार देशांच्या अटी आणि शर्तीनुसार आंबा निर्यातीपूर्वी विविध प्रक्रिया करून निर्यात करण्यात येते, असेही सुनील पवार यांनी स्पष्ट केले.

> पणन मंडळामार्फत उभारण्यात आलेल्या आंबा निर्यात पॅकहाउस, विकिरण सुविधांचे एनपीपीओ, 'अपेडा'; तसेच अमेरिकेकडून प्रमाणीकरण करण्याचे काम सुरू आहे. पणन मंडळाच्या सुविधांचे प्रमाणीकरण आंबा हंगामापूर्वी पूर्ण करण्यात येईल. यंदाच्या हंगामात दोन ते अडीच हजार टन प्रक्रियायुक्त आंब्याच्या निर्यातीचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले आहे.
>
> **- सुनील पवार,** कार्यकारी संचालक, पणन मंडळ

दै. "अग्रोवन" दि. ११/३/२०२२.

# केरळच्या आंब्याची 'देवगड' म्हणून विक्री!

## बाजार समितीची तीन अडत्यांवर कारवाई; ४२ पेट्या जप्त

**पुणे** : येथील गुलटेकडी मार्केट यार्डात केरळ आंब्याची 'देवगड हापूस' या नावाने विक्री केल्याचा प्रकार बुधवारी उघडकीस आला आहे. पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने फळ बाजारातील तीन अडत्यांवर कारवाई करून त्यांच्याकडून ७ हजार ८० रुपयांचा दंड वसूल केला आहे. यामध्ये एक डझनच्या ४२ पेट्या बाजार समितीने जप्त केल्या आहेत.

बाजारात कोकणचा राजा, अर्थात हापूस आंब्याची देवगड, रत्नागिरी येथून आवक होते. त्याशिवाय कर्नाटकातूनही आंबा येतो. मात्र दोघांच्या चव आणि सालीमध्ये फरक आहे. कोकणातील हापूस आंबा रसाळ आणि चवीस चांगला असतो. त्यामुळे कोकणातील आंब्यांना सर्वाधिक मागणी असते. म्हणूनच या आंब्याच्या किमतीही जास्त असतात. याचा फायदा घेत व्यापारी, विक्रेते नागरिकांची फसवणूक करतात. आंब्यांची अदलाबदल करून विक्री करतात.

हंगामाच्या सुरुवातीला असा प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे बाजार समिती यापुढे काय कारवाई करते हे महत्त्वाचे ठरणार आहे.

ग्राहकांची फसवणूक होणार नाही, याकरिता हे लेबल काढून मूळ जातीच्या नावाने विक्री करण्याकरिता बाजार समितीच्या प्रवेशद्वार क्र. १ वर या आंब्यांचा सकाळी ११ वाजेपर्यंत जाहीर लिलाव होणार आहे. ही कारवाई बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड यांच्या मार्गदर्शनाखाली फळ विभाग प्रमुख बाबासाहेब बिबवे, रोजंदारी कर्मचारी देवानंद खराडे आणि तोलणार यांनी केली.

**सुरुवातीला आंबा जप्त करून प्रत्येकी जीएसटीसह २३६० रुपये दंड वसूल केला आहे. व्यापारी, विक्रेत्यांनी आंबा जेथून आला आहे, त्याच नावे विक्री करावा.**
**- मधुकांत गरड,**
प्रशासक, कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे

**हापूस आतून केशरी आणि त्याची साल पातळ असते. त्यामुळे तो ओळखण्यास सोपा जातो. इतर राज्यांतील आंबा हा बाहेरून हिरवा, तर आतून पिवळा असतो. थोडा रसाळ आणि त्याचा आकार उभट असतो.**
- युवराज काची, आंब्याचे व्यापारी, मार्केट यार्ड



पुणे : देवगड हापूस म्हणून विक्री होत असलेला केरळ आंबा.

दै. "लोकमत" दि. ११/३/२०२२.

# प्रवेशद्वारावरच होणार शेतमालाची नोंद; शेतकऱ्यांची फसवणूक टळणार

## मधुकांत गरड : संगणक प्रणालीद्वारे शेतमालाची तत्काळ माहिती समजणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** मार्केट यार्डात प्रवेशद्वारावरच शेतमालाची नोंद संगणक प्रणालीत घेण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना बाजार आवारात माल पोहोचल्याची माहिती समजणार असून, आडते, व्यापाऱ्यांना आपल्या गाळ्यावर किती शेतमालाची आवक झाली, याची तत्काळ एसएमएसद्वारे माहिती मिळेल.

या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांची फसवणूक टळणार आहे, असा विश्वास कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड यांनी व्यक्त केला आहे.

पुणे जिल्ह्यासह विविध भागातून मार्केट यार्डात शेतमाल घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, म्हणून आता प्रवेशद्वारावर शेतमालाची माहिती नोंद करण्यास सुरुवात केली आहे. बाजार आवारात

आडत्यांना एसएमएसनुसार शेतमालाची आवक न झाल्यास त्याबाबतची तत्काळ तक्रार करणे सोईचे होणार आहे. आडत्यांच्या तक्रारीनुसार शेतमाल वाहनचालकाने कोणकोणत्या गाळ्यावर उतरवला याची खातरजमा करून त्यानुसार त्या आडत्याचे नावे आवक नोंद करणे सोयीचे होणार आहे.



शेतकऱ्यांची हिशेबपट्टी किंवा शेतमाल आवक याबाबत काही तक्रार निर्माण झाल्यास एमएमएस प्रणालीद्वारे पाठविलेल्या एमएमएसचा पुरावा ग्राह्य धरता येणार आहे. गेटवर होणारी आवक नोंद व प्रत्यक्ष गाळ्यावर होणारी आवक नोंद यामध्ये येणारी तफावत मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. शेतमालाची आवक आमच्या गाळ्यावर झाली नाही, असे आता आडत्यांना म्हणता येणार नाही. नोंदीनुसार संबंधित आडत्यांकडून बाजार फी घेणे सोईचे होणार असून उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ होईल.

- मधुकांत गरड, प्रशासक, कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे

शेतमाल घेऊन येणारे काही शेतकरी तसेच वाहनचालक आवकेची नोंद करताना एकाच आडत्याच्या नावे नोंद करून अनेक गाळ्यावर शेतमाल उतरवत होते. त्यामुळे प्रवेशद्वारावरील नोंदीनुसारी होणारी आवक व गाळ्यावरील आवक आणि प्रत्यक्ष झालेली आवक यामध्ये तफावत होत आहे.

बाजार शुल्काच्या रकमेबाबत वाद निर्माण होतात. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांनी पाठविलेला शेतमाल बाजार आवारात पोहोचल्याचे व आडते, व्यापाऱ्यांना आपल्या गाळ्यावर कोणत्या प्रकारच्या व किती शेतीमालाची आवक झाली याची माहिती बाजार समितीने एसएमएस प्रणाली विकसित केली आहे. संबंधित आडत्यांनाही मालाची खात्री करता येणार आहे.

दै. "अंजोवन" दि. १०/३/२०२२.

# स्ट्रॉबेरी उत्पादकांनी 'पणन'च्या योजनांचा लाभ घ्यावा

## सहकार, पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांचे आवाहन

**सातारा** : महाबळेश्वर भागातील स्ट्रॉबेरीस भौगोलिक मानांकन प्राप्त झाले आहे. येथे उत्पादित होणाऱ्या स्ट्रॉबेरीसारखे उत्पादन कोठेही होत नाही. या स्ट्रॉबेरीला विशेष मागणी आहे. स्ट्रॉबेरीला प्राप्त भौगोलिक मानांकनाचा उत्पादकांना जास्तीत जास्त लाभ होण्यासाठी उत्पादकांनी एकत्र येऊन पणन मंडळांच्या योजनांचा लाभ घ्यावा. तसेच विक्री तंत्र अवलंबवावे, असे आवाहन सहकार, पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनी केले.

भिलार (ता. महाबळेश्वर) येथे अॅग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट) अंतर्गत 'स्ट्रॉबेरी पीक उत्पादन, सुगीपश्चात हाताळणी, विपणन, प्रक्रिया संबंधी कार्यशाळा' पालकमंत्री बाळासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी श्री. पाटील बोलत होते.

पाटील म्हणाले, "स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन वाढून त्यांना अधिकाचा फायदा व्हावा यासाठी राज्य शासनाच्या मॅग्नेट प्रकल्पात स्ट्रॉबेरीचा समावेश केला आहे. मॅग्नेटसाठी स्ट्रॉबेरी पिकासंबंधी महाबळेश्वर भागातील दोन संस्थांचे प्रस्ताव आहेत. या माध्यमातून स्ट्रॉबेरीच्या काढणीपश्चात हाताळणीसाठी प्रशिक्षण, शीतगृह, पॅकहाउस, शीतवाहन, प्रक्रिया युनिट इत्यादी सुविधा निर्माण होणार आहेत. मॅग्नेट अंतर्गत स्ट्रॉबेरी पिकाची शास्त्रोक्त लागवड, काढणीपश्चात हाताळणी, विक्री व प्रक्रिया यासाठी उत्पादक, शेतकरी उत्पादक संस्था व इतर घटकांना मार्गदर्शन व्हावे यासाठी स्ट्रॉबेरी पीक माहिती पुस्तिका येथील स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे."

अनुप कुमार म्हणाले, "स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांनी जीआयमध्ये नोंदणी करून घ्यावी तसेच क्यूआर कोडचा जास्तीत जास्त वापर करावा. स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांमुळे येथे अॅग्रो टुरिझम हब तयार होईल."

दै. "ॲग्रोवन" दि. ५ मार्च २०२२.

महाॲग्रो

# हापूसच्या थेट विक्रीसाठी 'उत्पादक ते ग्राहक' साखळी

## कृषी पणन मंडळाचा पुढाकार; ७ मार्चपासून नोंदणी सुरू



ॲग्रोवन वृत्तसेवा

रत्नागिरी : हापूसच्या थेट विक्रीसाठी कृषी पणन मंडळाने यंदा पावले उचलली आहेत. 'उत्पादक ते ग्राहक' अशी साखळी तयार करण्यात येत असून, गेली दोन वर्षे त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. चालू वर्षाकरिता आंबा उत्पादकांना विक्रीकरिता राज्यात विविध ठिकाणी स्टॉल उपलब्ध व्हावेत यासाठी ७ मार्चपासून नोंदणी सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील यांनी दिली.

कोरोनामुळे मागील दोन वर्षे अनेक अडचणींचा सामना आंबा उत्पादकांना करावा लागला होता. वाशी, पुणे, अहमदाबादसह पश्चिम महाराष्ट्रात महत्त्वाच्या बाजारपेठांमधील विक्री यंत्रणेत कोरोना नियमांचा अडथळा निर्माण झालेला होता. त्यामधून सावरण्यासाठी आणि नवीन बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी पणन मंडळाकडून प्रयत्न चालू आहेत. गेल्या काही वर्षांत उत्पादक ते थेट ग्राहक अशी यंत्रणा उभी करण्यासाठी पणनकडून विशेष उपक्रम राबविले जात आहेत. त्यामध्ये मुंबई, पुण्यासह महत्त्वाच्या शहरांमध्ये बाजारपेठ परिसरात शासकीय स्टॉल आंबा विक्रीसाठी उपलब्ध करून दिले जातात. याला बागायतदारांकडून प्रतिसाद मिळत आहे. इच्छुक आंबा बागायतदारांनी रत्नागिरीतील शांतिनगर-नाचणे येथे असलेल्या कृषी पणन मंडळाचे विभागीय कार्यालयात कृषी व्यवसाय पणन तज्ज्ञ कपिल खामकर यांच्याशी संपर्क साधावयाचा आहे.

### नोंदणीसाठी ही कागदपत्रे लागणार

तीन स्टॉल नोंदणीकरिता आंबा कलमांच्या नोंदी असलेला सातबारा उतारा (मागील ६ महिन्यांच्या कालावधीतील), आधार कार्ड, स्टॉलवर विक्री करणाऱ्या कुटुंबातील व्यक्तीचे आधार कार्ड, कोरोना लसीचे दोन डोस घेतल्याचे प्रमाणपत्र, भौगोलिक मानांकन नोंदणी प्रमाणपत्र अत्यावश्यक आहे. पणन मंडळाच्या नावाने दहा हजार रुपये अनामतीचा धनादेश किंवा अनामत रक्कम भरलेली पावती अर्जासह जोडावयाची आहेत.

दै. "पुढारी" दि. १/३/२०२२.

# अडीच हजार टन आंब्यांवर प्रक्रिया करणार

**किशोर बरकाले**

**पुणे :** यंदाच्या हंगामात अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, दक्षिण कोरिया आणि युरोपियन देशांसाठी मिळून सुमारे अडीच हजार मे. टन आंब्यावर प्रक्रिया करून निर्यातीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी ही माहिती दिली. गतवर्षीच्या तुलनेत दुप्पट उद्दिष्ट ठेवण्यात आल्याचे ते म्हणाले. कोरोना साथीनंतर चालू वर्षी आंबा निर्यात अधिक व्हावी यादृष्टीने राज्य कृषी पणन मंडळाच्या निर्यात सुविधा केंद्रांवरील सर्व सुविधा गतिमानतेने कार्यान्वित करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. देशातून आंब्याची सुमारे पन्नास हजार मे. टनांपर्यंत निर्यात होत असते. त्यापैकी महाराष्ट्राचा सुमारे ३५ ते ४० हजार मे. टन इतका वाटा राहतो. त्यामध्ये हापूस, केशर हा महाराष्ट्रातील, कर्नाटकातील बैंगनपल्ली आणि उत्तर प्रदेशातील दशहरी, चौसा आदी जातींच्या आंब्यांवर प्रक्रिया करून महाराष्ट्रातून आंबा निर्यात होतो. पणन मंडळ, अपेडा, कृषी विभागाच्या सहकार्याने भौगोलिक मानांकन प्राप्त आंब्याच्या निर्यातीसाठी सांघिक प्रयत्न सुरू आहेत.



**कृषी पणन मंडळाच्या सुविधा केंद्रांचे उद्दिष्ट**

**पुढारी विशेष**

परदेशी बाजारपेठेमध्ये चांगल्या पॅकिंगमध्ये एकसारखा आंबा निर्यात करणे आवश्यक असते. त्याचबरोबर फळांची प्रत चांगली असणे, फळांवर डाग नसणे, ओरखडे नसणे या बाबीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. त्यासाठी ९ सुविधा केंद्रांमध्ये विविध प्रक्रिया करून हापूस व केशर आंबा निर्यात केला जातो, असेही पवार यांनी सांगितले.

जगामध्ये कोणत्या देशास आंबा निर्यात करावयाचा असल्यास त्या देशाच्या मागणीनुसार आंब्यावर कराव्या लागणाऱ्या प्रक्रियेत प्रामुख्याने व्हेपर हीट ट्रीटमेंट, हॉट वॉटर ट्रीटमेंट, विकिरण सुविधांचा समावेश होतो. आयातदार देशांना हव्या असलेल्या प्रक्रिया करूनच आंबा निर्यात केला जात असल्याचे पवार यांनी सांगितले.

## निर्यातीसाठी कराव्या लागणाऱ्या प्रक्रिया

■ **व्हेपर हीट ट्रीटमेंट :** या सुविधेमध्ये आंब्यांमधील फळमाशीचे निर्मूलन करण्यासाठी उष्ण बाष्प प्रक्रिया केली जाते. आंबा अशा प्रक्रियेत पन्नास मिनिटे ठेवला जातो. तसेच आंबा दक्षिण कोरिया देशास निर्यात करताना व्हेपर हिट प्रक्रियेत ५२ अंश सेल्सियस तापमानाला ३ मिनिटांची गरम पाण्याची प्रक्रिया करावी लागते.

■ **हॉट वॉटर ट्रीटमेंट :** फळमाशी निर्मूलनासाठी या सुविधेचा वापर केलेल्या आंब्यांची प्रामुख्याने युरोप, दक्षिण कोरिया, रशिया, मॉरिशियस, चीन या देशांना आंबा निर्यात होते. त्यामध्ये आंब्याला ४८ अंश सेल्सियस तापमानातील पाण्यात ६० मिनिटांसाठीची प्रक्रिया करावी लागते.

■ **विकिरण सुविधा :** या सुविधेद्वारे आंब्यांमधील कोय किडा आणि फळमाशीचे निर्मूलन करण्यासाठी उच्च तंत्रज्ञानावर आधारित विकिरण सुविधा वापरली जाते. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, मलेशिया येथे आंबा निर्यात करताना विकिरण प्रक्रियेत ५२ अंश सेल्सियस तापमानात ३ मिनिटांची गरम पाण्याची प्रक्रिया करावी लागते.